| | |
|---|---|
| MHKO170001192026 | **नियमित दिवाण दावा १९/२०२६**<br>**हिंदुराव जोती जांभळे**<br>**वि.**<br>**आनंदा जोती जांभळे** |

## नि.IA १/२०२६ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दावा मिळकत अनुषंगाने "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याकरिता दाखल केला आहे.

२. सदर कामी प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की,प्रतिवादी यांनी सदर दावा मिळकतीमध्ये आर.सी. सी बांधकाम सुरु केले असून दावामिळकत वडिलार्जित मालकीची आहे. त्यामध्ये वादींना कायद्याने हिस्सा प्राप्त होतो. मात्र सदर वस्तुस्थिती असून देखील प्रतिवादी हे वादींचा हिस्सा वादींना देण्यास तयार नाहीत. तसेच प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम सुरु केले आहे. सदरचे बांधकाम पुर्ण झाल्यास पुन्हा अनेक दावे वादींना दाखल करावे लागणार आहेत. त्यामुळे न्यायाचे कारणासाठी सदर कामी "जैसे थे" परिस्थिती आदेश पारीत करणे गरजेचे आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु केलेले नाही. वादी याने अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दिलेले नाही. वादी हे नेमक्या कोणत्या दावा मिळकतीमध्ये कोण बांधकाम करत आहेत याचा उल्लेख स्टेटस को अर्जास वादी यांनी केलेला नाही. या कामी नि. ५ चालविले शिवाय कोणताही आदेश करता येणारा नाही. त्यामुळे सदर कामी वादी यांचा अर्ज नामंजूर करणे

गरजेचे आहे. अंतिमतः प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. प्रतिवादी क्र. ३ तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, सदर कामी त्यांनी कैफियत दाखल केलेली आहे. सदरची कैफियत ही या अर्जाचे कामी वाचणे अत्यंत गरजेचे आहे. सबब, एकंदरितच या कामी वादी यांचा अर्ज नामंजूर करणे अत्यंत गरजेचे आहे. अंतिमतः प्रतिवादी क्र.३ तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

६. वादी यांचा अर्ज, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

७. कागदपत्रांचे अवलोकन केले असता, ही गोष्ट दिसून येते की, मुळातच सदर अर्ज वादी यांनी जैसे थे परिस्थिती ठेवणेकरिता दाखल केलेला आहे. मात्र सदर अर्जास वादी यांनी कोणत्याही स्वरूपाचे शपथपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे एकंदरितच सदरबाबत आदेश करणे योग्य होईल असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

**वादी यांचा नि.IA १/२०२६ वरील अर्ज दाखल करणेत आला आहे.**

**सही/-**
**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

पन्हाळा
दि. २१.०४.२०२६